**Journal of Interdisciplinary and Multidisciplinary Research (JIMR)**
E-ISSN:1936-6264| Impact Factor: 3.886|
Vol. 05 Issue 04, April-2010
Available online at: https://livejimrjournal.in/
(An open access scholarly, peer-reviewed, interdisciplinary, monthly, and fully refereed journal.)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आर्थिक चळवळ

**श्रीमती रत्ना लाला जवरास,** सहायक प्राध्यापक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड

**प्रस्तावना**

अस्पृश्यांचा आर्थिक प्रश्न हा अस्पृश्यांच्या आर्थिक प्रश्नाची निगडित आहे. अस्पृश्य हा मूळातच निर्धन असल्याने साहजिकच ते सधन स्पृशांवर अवलंबून असतात. प्रथमतः अस्पृश्यता तिच्या अनेक जातींच्या समावेश होतो, त्यापैकी जर सर्वच अस्पृश्य जातीवर दिली वर स्पृश वर्गाने बहिष्कार टाकला, तर स्पृश्य जातीचे जास्त मोठ्या प्रमाणात नुकसान संभवते. कारण चांभार आणि ढोर या दोन धंदेवाईक जाती आहेत. अर्थात स्पृशांनी त्याच्यावर बहिष्कारची मात्रा वापरली तर, नवीन जोडे बांधवायचे किंवा जुने जोडे सांधायचे बंद केले, तर त्यांचे काम चालण्यासारखे नाही. त्याचप्रमाणे मातंग लोकांचेही आहे. तेही धंदेवाईकच आहेत. त्यांनी जर दो-या, दोरखंडे, केरसुण्या करायचं बंद केले, तर त्यानेही स्पृशलोक नाडले जाणार आहेत. कारण बैलाला कासरा आणि मोटेला नाडा या शेतकऱ्यांच्या आयुधांपैकी महत्त्वाची अवजार आहेत. ते त्यांच्या हाती असल्यामुळे त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यास स्पृशांना जमण्यासारखे नाही. या उलट तर त्यांनीच बहिष्कार टाकला तर स्पृशाना क्षणार्धात त्यांच्यापुढे नमावे लागेल. त्याचप्रमाणे पहिले तर भंगी लोकही त्यांना एका क्षणात नमवू शकतात. त्यांचा धंदा जरी कमी प्रतीचा मानण्यात येत असला तरी, त्यांनी मनात आणले तर, त्यांच्या धंद्याची उपयुक्तता इतकी जबरदस्त आहे की, रोगाचे सत्र साऱ्या शहरात पसरवून ते सारी वस्ती नामशेष करू शकतात.

त्यात महारांची गत काय आहे. ते पाहिले तर, त्यांच्या जातीचा धंदा असा काही नाहीये. ते अगदी शेवटच्या पायरीचे राजपुरुषच आहेत. आणि शेवटी सरकारी नोकरीवरच त्यांची उपजीविका चालते. सरकारी नोकराला कोणाची काही देणे नाही. त्यालाही बहिष्कराचे भय नाही. आपली नोकरी भली आणि आपण भले. असेही महाराना म्हणता येऊ शकत होते. परंतु त्यांच्या दुर्दैवाने आज तसे त्यांना म्हणता येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे, ते महारांचे वतन होय. हे वतनदार असल्यानेच स्पृश्यावलंबीच आहेत. त्यांना गावात कुठलाही धंदा उपलब्ध नसल्याने, ते खेड्या पाड्यातून स्पृश्य लोकांवर अवलंबून आहेत. त्यावर उपाय म्हणून महारानी स्वतंत्र वसाहती कराव्यात. आणि त्यांनी खाटीविणण्याचा धंदा करावा. स्वतंत्र वसाहत केल्याने त्यांच्यावरही कोणी बहिष्कार टाकणार नाहीत. अस्पृश्यांना शेतीला जोडून इतरही धंदे करता येतील. शिंप्याचे किराणा मालाचे दुकान घालता येईल. स्वतंत्र वसाहती झाल्या तर खादीचा धंदा देखील त्यांना करता येईल. ही खादीस स्पृश्यांनी घेतली नाही तर,अस्पृश्यांच्या वर्गाने जरी खादी घेतली, तर महारांचा विणकारांचाही धंदा चांगला चालू शकेल. असा आशावाद डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दलितांसाठी आर्थिक विकास**

संपत्ती ही राष्ट्राच्या भरभराटीला मोठी कारणीभूत वस्तू आहे. या दृष्टीने तिचा संग्रह करणे अत्यंत आवश्यक आहे. पण त्या संपत्तीचा उपयोग जर गरीब प्रजेस नाडण्यात होत असेल, तर आणि आपली प्रौढी व वर्चस्व माजवण्याकडे जेव्हा संपत्तीवान लोक तिचा वापर करतात, तेव्हा त्यांच्या संपत्तीला असुरी संपत्ती असे

शास्त्रकारांनीच म्हणून तिचा धिक्कार केलेला आहे. पण आर्थिक स्वातंत्र्यासाठी झगडा करणारा अस्पृश्य लोकांविरुद्ध संपत्तीचा दुरुपयोग करणे हा धर्म आहे काय? संपत्तीच्या जोरावर अस्पृश्य लोकांना बहिष्कार टाकणे.व त्यामुळे त्यांची गती खुंटवणे हे पाप आहे. असे शास्त्र काराना का वाटत नाही. स्पृश्य लोकांनी सत्याग्रह केला तर त्या सत्याग्रहास प्रतियोग म्हणून बहिष्कार टाकला जाईल.हेच स्पृश्य लोकांना सांगत सुटण्याचे काहीच कारण नाही. व नव्हतेही. कारण ज्या अस्पृश्यांनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. त्यांना या भविष्याची प्रथमपासूनच पूर्ण कल्पना होती. आज अस्पृश्यवर्ग जागृत झाला आहे. व जागृत झालेल्या अस्पृश्य जनता आपली गती खुंटीत करणाऱ्या सर्व अडचणी दूर करण्यास आवश्यक तो स्वार्थात्याग करेल. इतकेच नव्हे तर प्राणांचीही तिलांजली देण्यास आता ती जनता तयार होईल. इतक्या थराला गेलेल्या प्रजेस स्पृश्य समाजाने बहिष्कार टाकला, तर त्याची तमा ही जनता बाळगणार नाही. सत्याग्रह विरुद्ध बहिष्कार हे शस्त्र अवलंबिले तर ते फार दिवस पाजळू शकत नाही. कारण आज अस्पृश्य लोकांना तळावर आणण्यासाठी बहिष्कारासारखे शस्त्र हाती घेऊन, स्पृश्य समाज अस्पृश्य लोकांना बहिष्कार टाकण्याची धमकी देत आहे. पण जेथे परस्परांतील आर्थिक संबंध दाता व याचक या सारखा असतो तेथे बहिष्कारचे मात्रा लागू पडण्याचा संभव असतो. परंतु जिथे परस्परांतील संबंध दानाच्या स्वरूपाचे नसून विनिमयाचे स्वरूपात असतो.तेथे बहिष्कार याची मात्रा लागू पडत नाही. कारण येथे बहिष्कार घालणे म्हणजे विनिमयाने होणारा स्वार्थ वाढवणे. असाच त्याचा परिणाम होतो. प्रत्येकाची स्वार्थावर नजर असल्याने परस्परांवर बहिष्कार घालून विनिमय आणि होणारा स्वार्थ वाढवण्यास कोणीच तयार होत नाही. तसे असते तर गिरणीच्या मालकांनी पोटभरू मजुरांवर कायमचा बहिष्कार टाकला असता. व इंग्रज व्यापाराविरुद्ध स्वदेशीच्या काळात पुकारलेला बहिष्कार सिद्धीस गेला असता. बहिष्कार या शस्त्राच्या माऱ्याने शत्रूच्या बरोबर स्वतःलाही घाव होतो. म्हणजे जे स्पृश्य लोक बहिष्कार याची धमकी देतात. त्यांनाही शस्त्र एकेरी आहे की, दुहेरी आहे याची कल्पना नसावी. किंवा त्यांनीच अस्पृश्य समाज परोपजीवी असून स्पृश्य समाज त्यांचे पोषण करतो. अशी त्यांची खोटी समजूत करून घेतलेली असावी. कारण हिंदू समाज रचना इतर समाजप्रमाणेच विनिमयावर आधारलेली आहे. तोच न्याय स्पृश्य व अस्पृश्य संबंधांना लागू आहे. त्यात उभयतांचा संबंध केवळ स्वार्थाचा आहे. अशा व्यवस्थेत एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर बहिष्कार टाकणे शक्य नाही. व टाकला तर फार काळ टिकणे शक्य नाही.

**अस्पृश्य स्वावलंबी कशी होतील**

परिणामी तशीच वेळ आली तर, अस्पृश्याच्या वर्गात अनेक जातींचा समावेश होतो. त्याच जातीपैकी कोणकोणत्या जातीत बहिष्कारचा विशेष लाभ होणार आहे. हे आधी ध्यानात घेतले पाहिजे. चांभार व ढोर हे धंदेवाईक असल्याने त्यांच्याकडेच गावातील जुने नवे जोडे बांधण्यास व सांधण्याचे काम असते. म्हणून त्यांच्यावर बहिष्कारची मात्रा लागू पडणार नाही.त्याचप्रमाणे मांग लोकही धंदेवाईक आहेत. त्यांनी दोऱ्या, दोरखंड, केरसुण्या करावयाचे बंद केले, तर स्पृश्य लोक अडले जाणार आहेत. उलट मांग लोकांनीच बहिष्कार टाकला तर स्पृश्यलोकांना एका क्षणात नमावे लागेल. कारण बैलांना कासरा आणि मोटेला नाडा ही शेतकऱ्यांच्या आयुंधापैकी एक महत्त्वाचा आयुध मांग लोकांच्या हाती असल्याने त्यांच्यावर या बहिष्कारची मात्रा लागू पडणार नाही. मात्र

अस्पृश्यातील भंगी समाजाचा काम धंदा नीच असला तरी, त्यांच्या धंद्याची उपयुक्तता इतकी जास्त आहे, की त्यांनी मनात आणले तरी साऱ्या गावात, शहरात रोगाचे सत्र पसरून सारी वस्ती नामशेष करू शकतात.

या सर्व जातीत महाराची गत काय आहे. हे लक्षात घेणे गरजेचे आहे. कारण महार जातीचा कोणताही धंदा नाहीये. अतिशय शेवटच्या पायरीचे का होईना ते राजपुरुषच आहेत. कारण सरकारी नोकरी वरती त्यांची उपजवीकका आहे. त्यांनाही बहिष्काराचे भय नाही. असे महारानाही म्हणता येण्यासारखे आहे. परंतु त्यांच्या दुर्दैवाने तसे म्हणता येत नव्हते. याचे मुख्य कारण म्हणजे महाराजचे वतन होय. या वतनामुळेच महार लोक स्पृश्याधीन झालेले आहेत. कारण त्यांच्या हाताखाली त्यांना नोकरी करावी लागते. त्यांचे सारे अधिकारी स्पृश्य लोकच आहेत. सर्व अधिकारी स्पृश्य लोक आपल्या अधिकाराचा उपयोग महार लोक पायरीने वागतात का हे बघता. याची खात्री करूनच, त्यांनी पायरी सोडली तर त्यांना शासन करण्याकडे ही त्यांच्या अधिकाराचा उपयोग करतात. सरकारी नोकरी करूनही स्पृश्य अधिकाऱ्याचे खाजगी काम न केल्यामुळे त्यांना शासन झाल्याचे अनेक उदाहरणे देता येतील. यातून स्पृश्य लोक खोटाच रिपोर्ट पाठवतात. मामलेदार त्याला दुजोरा देऊन प्रांताकडे पाठवतो. व प्रांत हुकूम देतो की, महाराना सस्पेंड करा. केवळ वरचा अधिकारी स्पृश्य असल्याने खोट्या धर्माभिमानाला बळी पडले असल्यामुळेच वतनाची गदा महारानावर बसते. म्हणून महाराना स्पृश्याधीन होऊन राहिल्याशिवाय गत्यंतर नाही.

**महार वतनव्यवस्थेत सुधारणा करा**

त्यात पहिली सुधारणा म्हणजे इनाम नात्याने सरकारचे जमिनीवर भर आकार देऊन जमीन ठेवता आली तर त्यांनी वतनी नोकरी सोडून देणेच हिताचे आहेत. म्हणजे एका दमात स्पृश्यांधीन व स्पृश्यावलंबी झालेली महार प्रजा आर्थिक दृष्ट्या स्वातंत्र्य होईल. एवढे करता येत नसले तरी, रयतेकडून पगार घेण्याऐवजी सरकारकडून पगार मागावा. त्याने स्पृश्याधीन आसले तरी स्पृश्यावलंबी आसणार नाही.तसेच वतन सोडून देऊन दुसरा उपजीविकेचा मार्ग पत्करला तर जो माणूस जन्माला येतो परंतु या नोकरीबद्दल तो व्यक्ती परत्वे कोणता ना कोणता उद्योग करून पोट भरतो. मग महाराना पोट भरता येणार नाही का? म्हणून महाराना आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर त्यांना काही सूचना केलेल्या आहेत.

**वेगळ्या वसाहती करा**

गावातील लोक जेथे महारांना कसपटासमान लेखतात, लहान सहान कारणाःवरून त्यांचा गाव बंद करतात. त्यांच्यावर बहिष्कार घालतात. त्यांना गावात शिवी शिवाय बोलत नाही. त्या गावात राहण्याचा आग्रह महार लोकांनी का धरावा. ही मोठी शरमेची गोष्ट आहे. तेव्हा महार लोकांनी गावचा अभिमान सोडून, गावात पाच दहा घरांची लहान वस्ती करून एक वेगळी वसाहत करता येईल. अशा प्रकारची वसाहत फॉरेस्ट जमीनी जेथे आहेत, तेथे केली तर वतन गेल्यामुळे होणारे नुकसान शेती करून महारांना हजारो पटींनी भरून काढता येईल. व तेही कोणाची गुलामगिरी न करता स्वतंत्रपणे करता येईल. या वसाहतीपासून नुसती उपजीविकाच नाही, तर दुसरे अनेक फायदे आहेत. गावात राहिल्याने त्यांना कोणताच व्यवसाय करता येते नाही. परंतु त्यांनी जर वेगळी वस्ती केली तर त्यांना सर्व प्रकारचे मार्ग मोकळे होतील. महार पाटील होऊ शकेल, महाराला किराणा मालाचे दुकान घेता येईल. शिंप्याचे दुकान घेता येईल. एवढेच नाही, महारांच्या मुलांना मुळातच शिवाशिवचे

**Journal of Interdisciplinary and Multidisciplinary Research (JIMR)**
E-ISSN:1936-6264| Impact Factor: 3.886|
Vol. 05 Issue 04, April-2010
Available online at: https://livejimrjournal.in/
(An open access scholarly, peer-reviewed, interdisciplinary, monthly, and fully refereed journal.)

भय असते. त्यामुळे ते स्वतःला अपवित्र समजतात. हीन समजतात. शिवी शिवाय भाषा त्यांच्या कानावर पडत नाही. आपण कनिष्ठ आहोत. खालच्या जातीत जन्माला आलेलो आहोत.असे वाटून ते मनाने दुबळे होणार नाहीत. यासाठी दोन प्रकारचे सहाय्य पाहिजे.

१. सरकारचे सहाय्य

२. गाव सोडण्यास तयार होणे.

यापैकी आपल्या इलाख्यात इंग्रज सरकारने बेरड लोकांची वेगळी वस्ती तयार केलेली आहे. तीच योजना महारांनाही लागू होते. प्रश्न उरतो तो महार लोक गाव सोडून जाण्यास तयार होतील का? कारण वडिलांचा गाव सोडून जाणे,याचे त्यांना मोठे कोडे पडते. वडील मेले तेथेच आपण मरणे. हेच आपले कर्तव्य ते समजतात. सर्वच महारांनी फॉरेस्ट जमिनीवर आपली वसाहत करून शेतीवर आपली उपजीविका भागविता येईल. एवढे मोठे क्षेत्र सापडणे कठीण असले तरी, शेतीला जोडून दुसरा काहीतरी धंदा माहार लोकांना करता येऊ शकते. परंतु पैशांच्या व अनुभवाच्या अभावी श्रेष्ठ प्रतीचे धंदे या वर्गाला करता येत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब यांनी त्यामध्ये अशा प्रकारचा एकच धंदा आहे.तो म्हणजे खादी विणन्याचा धंदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महारांना आपला आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी व गावातील समाजापासून आपले वेगळेच आणि स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी खादी विणण्याचा धंदा करण्याची शिफारस केलेली आहे. परंतु महार लोकांना याविषयी एक भीती होती. त्यांच्या मते,आम्ही बनवलेला माल कोण विकत घेणार? त्याला स्पृश्य बाजारात किंमत नसेल तर त्याचा काय उपयोग? परंतु बाबासाहेबांच्या मते, हा प्रश्न सोडवणे काही कठीण नाही. सर्वच महार लोकांनी निश्चय केला तर, महारालोकांनी विणलेल्या खादी शिवाय दुसरी कोणाची खादी वापरणार नाही. तर माहार जातच महारांची मोठी गिऱ्हाईक होईल. आता प्रश्न येतो तो आर्थिक सहाय्यतेचा. परंतु ते मिळवण्यास फारसे प्रयास लागणार नाही. केवळ अस्पृश्य समजणाऱ्या समाजाने खादी वस्त्र विकत घेतले तरी, महारांचा खादी विन्याचा धंदा सहज चालू शकेल. खादी संबंधात नागपूरला निघालेल्या एका प्रश्नाचे संदर्भात बोलताना बाबासाहेब म्हणतात, की पूर्व महाराष्ट्रातील आज बऱ्याचशा महारांचा विणकराचा धंदा आहे. म्हणून तुमच्या व आमच्या पूर्वजांनी नुसती खादी वापरली नाही, तर त्या धंद्याचे निर्माते आहेत. त्या धंद्यावर त्यांचा नुसता उदरनिर्वाह चालत नसून अब्रूचेही रक्षण ते करतात. ते आपल्या संस्कृतीच्या अस्सल प्रतीक आहे. तो आपल्या मानाचा विणकरीचा धंदा सोडून गावकीचे कामे घेऊन बसला आहात. वस्तुतः आम्हाला अशा मूळ धंद्याचे संशोधन करून उद्या जीवनाला उपयोगी पडेल, अशी स्थिती निर्माण करता आली म्हणजे आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होणे आणि आपला दर्जा उंचावू शकतील.

महारांचा आर्थिक दर्जा उंचवण्यासाठी मुंबई इलाख्यातील वतनदारांच्या संबंधात कायद्याच्या १५ व्या कलमाला अनुसरून बेळगाव जिल्ह्यातील 'गावनाळ' येथे भरलेल्या सभेत महार वतनासंबंधी काही ठराव पास करण्यात आले.

१) स्वतःची उन्नती करण्याच्या बाबतीत महार समाजाकडून चाललेल्या प्रयत्नामध्ये महारकी वतन एक मोठी आडकाठी आहे. म्हणून ज्या महारांना वतनातून सुटका करून घ्यायची असेल,त्यांना तसे करण्याचा मार्ग मोकळा व्हावा त्याकरिता महारकी वतनाचे मोबदल्यात रूपांतर करण्याच्या अटी सरकारने लवकर मान्य कराव्यात.

२) वतनदार महारांना काळीपांढरीचे,बलुत्याचे,व भाकरीचे हक्क त्यांच्या रूपाने कमाचा मोबदला देण्याची जी पद्धत आहे. तीच महार समाजाच्या सहाय्य आणि निकृष्ट स्थितीचे मूळ कारण आहे. त्यामुळे महार वतनाबद्दलचे देणे बलुत्याचे ऐवजी नगदीच्या रूपाने जमीन महसुला बरोबरच सरकारने वसूल करावे. तसेच पाटील,कुलकर्णीच्या बाबतीत करण्यात येते, त्याप्रमाणे महारांचा पगार सरकारी खजिन्यातून देण्यात यावा. ३) महारांची नोकरीची कामे कोणती, याविषयी निश्चितपणा नसल्याने त्यांच्यावर सरकारी दुय्यम अधिकाऱ्याकडून जो जुलूम करण्यात येतो. त्याचा बंदोबस्त व्हावा. महारांच्या नोकरीची कामे शक्य तितक्या लवकर निश्चित करावी.

४) काही ठिकाणी पूर्वजांनी वतनी जमिनी विकून टाकल्यामुळे व त्या परत मिळवण्याची मुदतही टळून गेल्यामुळे महाराना मुशाहिऱ्याच्या मोबदल्याखेरीज आपली कामे करावी लागतात. परंतु वतनदार कामाच्या संबंधाच्या कायद्याच्या अन्वये दुसऱ्याच्या हाती गेलेल्या जमिनी परत देण्यात याव्यात. अशी शिफारस या ठरावात करण्यात आली.

५) गावाची स्वच्छता ठेवणे हे महाराचे काम आहे. परंतु वतनदार कामगार संबंधीच्या चौथ्या कलमाची हा ठराव विसंगत आहे. तरी तो सरकारने रद्द करावा. अशी सूचना या परिषदेमध्ये ठेवण्यात आलेली होती.

६) महारानाच्या बलुत्याचा जो हक्क आहे. तो गावातील लोकांची खाजगी कामे करण्याचा मोबदला म्हणून आहे. महाराना त्यांच्या वतनाच्या मोबदल्यात लोकांची खाजगी कामे करण्यास सांगायला, कायद्याचा काहीच आधार नाही. तरी महारांना रयतेच्या खाजगी कामाच्या जबाबदारीतून मुक्त करणे आवश्यक आहे. असा ठराव या त्या ठिकाणी करण्यात आला.

म्हणून महाराना जर आपली माणुसकी मिळवायची असेल तर, त्यांनी रयतेच्या गलामगिरीतून मुक्त झाले पाहिजे. आणि जर त्यांना मुक्त व्हायचे असेल, तर त्यांनी वरील गोष्टी एकनिष्ठतेने करायला पाहिजे. त्याशिवाय त्यांचा मार्ग सुकर होणार नाही.

**संदर्भ**

१. श्री.बाबुराव बागुल, दलित साहित्य एक अभ्यास, बुद्धीपट पब्लिशिंग हाऊस, नागपूर
२. सुनील चंदनशीवे, मराठी दलित कविता : एक चिकित्सक अभ्यास, डिंपल पब्लिकेशन, ठाणे
३. श्री. के. एस. मेश्राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धार्मिक विचार, अस्मितादर्श
४. डॉ.भदन्त आनंद कौशल्यायन, मनुस्मृती का जाळली गेली? अशोक प्रकाशन, नागपूर
५. डॉ. निर्मलकुमार फडकुले, धर्म आणि संस्कृती विशेषांक, अस्मितादर्श